संपादक, मुद्रक व प्रकाशक–
बाळाजीदेव आ. पाटील सत्यवादी
प्रेस, सत्यवादी भवन, लक्ष्मीपुरी
कोल्हापूर

Date 16-9-1957

सत्यवादी

॥ निःस्पृहस्य तृणम् जगत् ॥

विभागीय मंडळाची बैठक व सरहद्दीचा प्रश्न

राज्यपुनर्रचना कायद्याखाली मुंबई म्हैसूर, मद्रास, केरळ आदि राज्यांसाठी अस्तित्वांत आलेल्या प. विभागीय मंडळाची बैठक येत्या शुक्रवार ता. २० रोजी बंगलोर येथें भरणार आहे. केंद्रीय गृहमंत्री प. पंत हे या सर्वच झोनल कौन्सिल्सचे (विभागीय मंडळें) अध्यक्ष आहेत. या मंडळासमोर सध्या सरहद्दीवरील वादग्रस्त प्रदेशाचा प्रश्न आहे. राज्यपुनर्रचना कायदा मंजूर करण्यांत आला तेव्हां सरहद्दींचा प्रश्न निकालात काढणें केंद्र सरकारला जवळजवळ अशक्य झाले होते. राज्य पुनर्रचना मंडळानें केलेल्या शिफारशीप्रमाणे नवीन राज्यांची रचना करणें फारसें कठीण नव्हते. पण कांहीं शिफारशी ना अनेक राज्यातील जनतेचा तीव्र विरोध होता. एका भाषिक प्रदेशातील लोकांची जी मागणी होती तिला दुसऱ्या भाषिक प्रदेशातील लोकांचा तितकाच जोरदार विरोध होता अशा वातावरणांत सर्वांना मान्य होणारा मार्ग शोधून काढणे बरेंच अवघड होते. यासाठीं राज्यपुनर्रचना मंडळाच्या शिफारशी आणि पार्लमेंटचें मत विचारांत घेऊन ढोबळ स्वरूपाची राज्यें अस्तित्वांत आली व सरहद्दी सारखे वादाचे प्रश्न पुढें भविष्यकाळांत विभागीय मंडळांकडे सोपविण्यांत आले. त्याप्रमाणें मुंबई, म्हैसूर, मद्रास, केरळ आदि राज्यांसाठीं स्थापन झालेल्या प. विभागीय मंडळाची पहिलीच बैठक येत्या शुक्रवारी भरणार असून तींत सरहद्दी विषयक वादाच्या प्रश्नांचा निकाल लावला जाईल असें आम्हांस वाटतें आणि म्हणून मुंबई-म्हैसूर या राज्यांच्या दरम्यानच्या सरहद्द विषयक प्रश्नाकडे आम्हीं मंडळाचे लक्ष वेधूं इच्छितो.

x x x

भाषिकांची लोकसंख्या आहे. त्यामुळें हा विभाग मुंबई राज्यांत घालणेंच क्रमप्राप्त आहे पण त्याहीपेक्षां अशा प्रश्नांचा निर्णय घेतांना अन्य कांहीं गोष्टींचाही विचार केला पाहिजे या विभागांतील जनतेचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संबंध कोल्हापूरशी निगडीत आहेत. या प्रदेशातील शेतकऱ्यांचा बाजार पेठ मुंबई राज्य ही आहे. राज्यांची पुनर्रचना करताना जनतेचे व्यापारी हितसंबंध प्रामुख्यानें लक्षांत घतले पाहिजेत व्यापार उदीम, सांस्कृतिक व सामाजिक एकजिनसीपणा आणि भौगोलीक सलगता यांचा विचार केल्यास सरहद्दीवरील मराठी भाषिक भाग मुंबई राज्यांत घालणे हे लोकहित व राज्यकारभार या दृष्टीनें आवश्यक आहे. भाषिक राज्य हयींत हा गोष्ट मान्य केल्यानंतर ज्या त्या भाषेचे लोक त्यां त्या राज्यांत गेले पाहिजेत हे तत्व उमदेपणानें उभय बाजूनी पाळले पाहिजे.

x x x

मुंबई सरकारच्या वतीनें मुंबईचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी प. विभागीय मंडळाचे अध्यक्ष व केंद्रीय गृहमंत्री पं. पंत यांना आपले निवेदन सादर केलें असून सरहद्दीवरचे मतभेद कसे मिटवावेत हें स्पष्ट केले असल्याचे समजते. याबाबत असें समजते कीं त्यांनी खेडें हे घटक धरुन सरहद्दीवरील प्रदेशाचा प्रश्न सोडवावा असें सुचविले आहे. ही बातमी सत्य असेल तर मुंबई राज्यातील सर्व पक्षीय जनता त्यांच्या या सूचनेमागे उभी राहील यांत शंका नाहीं. लोकांच्या सोयीसाठी जर भाषिक राज्यें असतील तर दोन स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करण्याचा भावना या प्रश्नांत राखणें योग्य नाहीं. मराठी भाषिक भाग मुंबई राज्यांत एकत्र येणें जसें आवश्यक आहे तद्वतच कानडी भाषिक भाग म्हैसूर राज्यांत गेला पाहिजे दोन्हीं सरकारें ही देवाण घेवाण वृत्ति स्वीकारतील आणि ज्याचे जें आहे तें त्याला समंजसपणानें देण्यास तयार होतील अशी आम्हांस आशा वाटते. विभागीय मंडळानें आपल्या आगामी बैठकींत खेडें हे घटक धरुन हा प्रश्न सोडवावा असे आम्हांस वाटते. आमच्या या सूचनेचा मुंबई व म्हैसूर सरकारचे प्रतिनिधी आणि केंद्रीय गृहमंत्री पं. पंत विचार करतील अशी आम्ही आशा बाळगतो.

निपाणी, बेळगांव, कारवार वगैरे सध्याचा म्हैसूर राज्यातील मराठी भाषिक भाग मुंबई राज्यात घालावा अशी मागणी मराठी जनता करीत आहे. राज्यपुनर्रचना मंडळाच्या शिफारशीप्रमाणें हा भाग म्हैसूर राज्यांत समाविष्ट करण्यात आला असला तरी या भागांतील मराठी भाषिक जनता गेली सुमारे २ वर्षें या निर्णयाविरुद्ध आकाश पाताळ एक करीत आहे. म्हैसूरमधील लोक हा भाग मुंबई राज्याला पुन्हा जोडण्यास मुळ सुद्धा नाहींतच पण मुंबई राज्यांत घालण्यांत आलेला बेळगांव, अक्कलकोट वगैरे कानडी भाषिक भाग म्हैसूर राज्यांत घातला गेला पाहिजे अशी मागणी करीत आहेत. अशा प्रकारचे मतभेद सरहद्दीवरील प्रदेशाबाबत झाले तर त्याबद्दल कोणत्याही भाषिकावर कांही आरोप करणें चूक होईल. अशा मागणीत केवळ प्रादेशिक महत्वाकांक्षाच असते असे म्हणता येणार नाही. आपापल्या भाषेतील लोकांबद्दलची स्वाभाविक ओढ अशा मागण्यामागे असते आणि म्हणून हे मतभेद आतां बरेच जुने झाले असल्यामुळें विभागीय मंडळ याबाबत समंजसपणाचे निर्णय घेऊं शकेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

x x x

निपाणी, बेळगांव, कारवार वगैरे प्रदेशाबाबतचे मतभेद सोडवितांना केवळ भाषा हाच घटक विचारांत घेऊन चालणार नाहीं. निपाणी विभाग हा सांगली–कोल्हापूरला जोडणारा दुवा आहे. या विभागांतील ८० टक्क्यापेक्षां अधिक मराठी